# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in


जा क्र. तंशिविकापु/विवि/अशिवियो/११-१२/ ९८८७ दिनांक :- 12 DEC 2011

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी/पदविका अभ्यासक्रम अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/
हॉटेलमॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी/आर्किटेक्चर/

विषय :- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित येणा-या महाराष्ट्र राज्यातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी/पदविका विद्यार्थ्यांसाठी अमार्त्य शिक्षण विमा योजना आणि विद्यार्थी अपघात विमा योजना लागू करण्याबाबत.

संदर्भ :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीपी/अशिवियो/२०११/५३२२ दिनांक २८/११/२०११.

उपरोक्त पत्रान्वये कळविल्यानुसार सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी /पदविका अभ्यासक्रमांना शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकरीता शासनाने शासन निर्णय क्र .टिईएम/२०११/(११/२०११)/तांशि-४/ दि. २५/०८/२०११ अन्वये शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून **अमार्त्य शिक्षण विमा योजना आणि विद्यार्थी अपघात विमा योजना लागू** केली आहे.

याबाबत सर्व संस्थांप्रमुखांना कळविण्यांत येते की, नॅशनल इन्सुरन्स कंपनी विभागीय कार्यालय, कॉसमॉस कमर्शियल कॉम्प्लेक्स, २०५ बीई, न्यू शाहूपूरी, कोल्हापूर या कंपनी मार्फत चालविण्यांत येणा-या **अमार्त्य शिक्षण विमा योजना आणि विद्यार्थी अपघात विमा योजना** राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून राबविण्याबाबतचे धोरणात्मक निर्णय शासनाने विद्यार्थ्यांचे हित विचारात घेऊन घेतले असल्यामुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रवेशित विद्यार्थ्याच्या बाबतीत ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी अशाप्रकारची विमायोजना घेतली असेल असे विद्यार्थी वगळता इतर विद्यार्थी तसेच शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर योजना प्राध्यान्याने देण्याबाबत संबंधित संस्थांना सूचित करण्यांत येत आहे. विम्यासंबंधातील पुढील माहितीसाठी सर्व संस्थांनी संबंधीत विमा कंपनीशी संपर्क साधावा. सर्व नवीन विद्यार्थ्यांना विमा संबंधाचा लाभ होईल असे पहावे.

(डी. एन. शिंगाडे )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.